तरुण भारत रविवार, २७ नोव्हेंबर २०२२

# प्रत्येकाने संविधानाचे पालन करा!

## संविधान दिन कार्यक्रमात न्यायाधीश वाय. पी. बावकर यांचे प्रतिपादन

**वार्ताहर**
**दोडामार्ग**

आपणास मिळालेल्या संविधानाचे पालन करणे हेच प्रत्येक भारतीयांचे मूलभूत कर्तव्य आहे, असे प्रतिपादन दोडामार्ग न्यायालयाचे न्यायाधीश वाय. पी. बावकर यांनी केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख विवेकानंद नाईक, ॲड. सोनू गवस, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत आदी उपस्थित होते.

न्यायाधीश बावकर पुढे म्हणाले की, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर, भारतीय स्मृती लढ्यातील आदर्शांची जोपासना, भारतीय सार्वभौमत्वाचे संरक्षण, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, वर्गीय भेद न करणे, बंधुभाव जोपासणे, स्त्रियांचा आदर करणे, संमिश्र संस्कृतीचे व नैसर्गिक साधनसंपदेचे रक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करून राष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यासाठी ६ ते १४ वर्षे वयातील प्रत्येक बालकास समान व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे.



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात संविधानाबाबतची प्रतिज्ञा घेताना न्यायाधिश वाय. पी. बावकर सोबत अन्य. समीर ठाकुर

यावेळी महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख विवेकानंद नाईक यांनी आपले विचार मांडले. ॲड. सोनू गवस यांनी भारतीय घटनेचे महत्व सांगून तिची उपयुक्तता विषद केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत म्हणाले की, संविधान हा आपला सर्वांचाच पवित्र ग्रंथ आहे. अतिशय कष्ट आणि परिश्रमातून तयार झालेला हा ग्रंथ सर्वांनी वाचावा. त्यानुसार आपले वर्तन करावे. आपली जडणघडण त्यानुसार असावी, असे स्पष्ट केले. प्रास्ताविक डॉ. संजय खडपकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे यांनी तर आभार प्रा. प्रीती प्रसादी यांनी मानले. यावेळी प्रतिक्षा नाईक या विद्यार्थिनीने संविधानाच्या उद्देशीकेचे वाचन केले.